लोकमत

## विज्ञान



डॉ. व्ही. एन. शिंदे

# स्वच्छ ते सुंदर



स्वच्छतेचे महत्त्व महात्मा गांधीजींना पटले होते. त्यांच्या आयुष्यात ते व्रतासारखे जपले. इतरांना सांगितले. मात्र, ज्या देशात हा युगपुरुष जन्मला त्या देशात आजही स्वच्छता मोहीम राबवावी लागते, आपण राबवतो. यावर्षीही दोन ऑक्टोबरला राबवली. त्यापूर्वी दोनच दिवस एका मैदानावर शालेय स्पर्धा झाल्या होत्या. त्याच्याही अगोदर एका मोठ्या भारतीय कंपनीच्या स्पर्धा झाल्या होत्या. ती कंपनी आपल्या सीएसआरमधून मोठी रक्कम या स्वच्छता मोहिमेसाठी खर्च करतात असे समजते. मात्र, या दोन स्पर्धा संपल्यानंतर एका सेवानिवृत्त अधिकाऱ्याने मला संदेश पाठवला की, 'स्पर्धा पार पडल्या. मात्र, आमच्या फिरायच्या भागात सर्वत्र कचराच कचरा झाला आहे. जरा लक्ष द्याल का?' दोन ऑक्टोबरला एका टीमने ते मैदान स्वच्छ करावे, असे नियोजन केले आणि ते झाले सुद्धा, पण हे सर्व पाहून मला वाईट वाटत होते. देशाचे पंतप्रधान आज महात्माजींच्या स्वच्छता मोहिमेचा शंभर वर्षांनंतर आग्रह धरतात, नव्हे त्यांना धरावा लागतो, तर आपण खरंच या देशाचे जबाबदार नागरिक आहोत का?

स्वच्छता ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. जेथे घाणीचे साम्राज्य आहे तेथे आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात. जेथे अस्वच्छता तेथे रोगराई पसरते. साथीच्या रोगांचे साम्राज्य निर्माण होते. स्वच्छ हवा, पाणी आणि पर्यावरण सर्वांना हवे असते. स्वच्छता जीवनाचा अविभाज्य भाग आहे. स्वच्छतेची सुरुवात स्वत:च्या शरीरापासून होते. सकाळी उठल्यापासून आपण आपले शरीर, सर्व अवयव स्वच्छ ठेवण्यासाठी जागरुक असतो. बाहेरुन आल्यानंतर हात-पाय धुऊन घरात वावरतो. जेवणापूर्वी हात धुतो. हे सर्व निरोगी राहण्यासाठी आवश्यक असते.

त्याचप्रमाणे आपला परिसर स्वच्छ ठेवायला हवा. मात्र, आपण आपला परिसर स्वच्छ ठेवण्याकडे पूर्णत: दुर्लक्ष करतो. आपले घर स्वच्छ करायचे आणि शेजारच्या दारात कचरा टाकायचा, इतकी टोकाची विकृती पाहायला मिळते. शेजारच्या दारात टाकलेला कचरा वाऱ्याने पुन्हा आपल्या दारात येऊ शकतो याचेही भान नसते. सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता असली पाहिजे, हे कळते पण वळत नाही, ही आजची परिस्थिती आहे.

आजही अनेकजण उघड्यावर शौचास जातात. गुटखा, तंबाखू, पान याच्या पिचकाऱ्या भिंतीवर टाकतात. मद्यप्रेमी मद्य प्राशनानंतर बाटल्या तेथेच फेकून जातात. प्लास्टिक बाटल्या गाडीतून रस्त्यावर फेकतात. कोणी टोकलच तर रस्ता काय तुझ्या बापाचा का? म्हणून विचारतात. विचारणारा सज्जन असेल, तर गुमान बाटली उचलून योग्य ठिकाणी टाकतो. नाहीतर असा कचरा ऊन, पाऊस झेलत तिथेच पडतो. हळूहळू त्याची झीज होते. ते पाण्यात मिसळते अन् पाणी प्रदूषित होते. कोणीतरी असा कचरा पेटवतो. त्यामुळे हवेचे प्रदूषण होते. त्यातून अपायकारक घटक वातावरणात मिसळतात आणि आपण या गोष्टींना जबाबदार असतो.

संवेदनशील मनाचे आर. आर. पाटील यांनी २००० मध्ये संत गाडगे महाराज ग्राम स्वच्छता अभियान महाराष्ट्रात सुरु केले. शिवाजी विद्यापीठाने २०१३ पासून स्वच्छता मोहीम राबवायला सुरुवात केली. पुढे केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियान ही योजना आणली. आता पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वच्छता हे आपले उद्दिष्ट असले पाहिजे असे सांगत आहेत. महानगरपालिका आयुक्त मल्लिनाथ कलशेट्टी स्वत: स्वच्छता उपक्रमात सर्वांत पुढे राहतात. प्लास्टिकविरुद्धही त्यांनी मोहीम उघडली आहे. आज शिवाजी विद्यापीठात दररोज हजारो लोक फिरायला येतात, त्याचे महत्त्वाचे कारण या परिसरातील स्वच्छता आहे.

जेथे स्वच्छता तेथे सुंदरता असते. स्वच्छता केवळ शासकीय यंत्रणेच्या कामातून साध्य होत नाही. त्यासाठी प्रत्येकाने योगदान द्यायला हवे. फक्त आपले घर नाही, तर आपला परिसर स्वच्छ ठेवायला हवा. कचऱ्याची नीट विल्हेवाट लावायला हवी. प्लास्टिकचा वापर टाळायलाच हवा. प्रत्येकाने हे करायचे ठरवले तर वेगळ्या स्वच्छता मोहिमेची गरज राहणार नाही. आपण जन्मलो तेव्हा जग सुंदर होते. मी जाईन तेव्हा हे जग त्याहून सुंदर असावे, या उद्देशाने प्रत्येकाने थोडे योगदान दिले, तर...

**(लेखक विज्ञान व तंत्रज्ञान विषयाचे अभ्यासक आणि शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव आहेत.)**

पुढारी

# अपारंपरिक ऊर्जेचा वापर करून पर्यावरणाप्रती अहिंसा आवश्यक

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे; विद्यापीठात २५० सौरदूतांना प्रशिक्षण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

स्वच्छ ऊर्जा व ऊर्जेच्यासंदर्भात स्वयंपूर्णता हा जगातील प्रत्येक नागरिकाचा अधिकार आहे. त्यासाठी युवकांनी अपारंपरिक ऊर्जेचा वापर करून गांधी जयंतीच्या निमित्ताने पर्यावरणाप्रती अहिंसा व प्रेम प्रदर्शित करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात आयआयटी, मुंबई यांच्या सहकार्याने महात्मा गांधी यांच्या १५०व्या जयंतीच्या निमित्ताने 'गांधी ग्लोबल सौर यात्रा' उपक्रम ांतर्गत विद्यार्थी सौरदूत कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, जगभरातील विद्यार्थ्यांमध्ये जाणीव जागृतीसाठी आयआयटीने गांधी जयंतीच्या निमित्ताने जगभरातील ८० देशांतील चार हजार केंद्रांमध्ये ग्लोबल सौर यात्रेचे आयोजन केले. त्यात विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागाचा समावेश असणे ही अभिमानाची गोष्ट आहे.

तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे. एस. बागी म्हणाले. गांधी ग्लोबल सौर यात्रेतून जगभरात सौरऊर्जेबाबत जागृती व अपारंपरिक ऊर्जा वापरण्यासाठी प्रोत्साहन देण्याचा उद्देश आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर. वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे उपस्थित होते. तंत्रज्ञान अधिविभागातील प्रवीण प्रभू यांनी कार्यशाळेचे समन्वयक व मार्गदर्शक म्हणन काम पाहिले.



**कोल्हापूर : सौरदूत कार्यशाळेत बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत डॉ. विलास नांदवडेकर, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, व्ही. टी. पाटील, गजानन पळसे.**

### २५० सौरदूतांनी बनविले सोलर स्टडी लँप

तंत्रज्ञान अधिविभागात आयोजित कार्यशाळेत बी.टेक.च्या सुमारे २५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना सोलर स्टडी लँप बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. टेक्विप उपक्रमांतर्गत आवश्यक साधनांची विद्यार्थ्यांना उपलब्धता करून देण्यात आली. सौरऊर्जेच्या प्रसारासाठी काम करण्याची व पर्यावरणाप्रती अहिंसाधर्म बाळगण्याची शपथ देण्यात आली.

# स. ब. खाडे महाविद्यालय संघाला विजेतेपद

## शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतरविभागीय पुरुष हॉकी स्पर्धा




कोल्हापूर ता. ३ : शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतरविभागीय पुरुष हॉकी स्पर्धेत कोपर्डे येथील स. ब. खाडे महाविद्यालय संघाने विजेतेपद पटकावले. ही स्पर्धा मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम येथे झाली. संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे या स्पर्धेचे आयोजन झाले.

उपांत्य सामन्यात शिवराज महाविद्यालय गडहिंग्लज संघाने मुधोजी कॉलेज फलटण संघावर ५-६ गोल फरकाने विजय मिळवला. तर स. ब. खाडे महाविद्यालय कोपर्डे संघाने वाय. सी. कॉलेज इस्लामपूर संघावर



कोल्हापूर : आंतरविभागीय हॉकी स्पर्धाविजेता स. ब. खाडे महाविद्यालय संघ. सोबत प्रशिक्षक व मान्यवर.

२-१ ने विजय मिळवला. अंतिम सामन्यात स. ब. खाडे महाविद्यालय संघाने शिवराज महाविद्यालय संघावर ३-० गोल ने विजय मिळवला.

विजेते खेळाडू असे : सौरभ शिंदे, आदेश पाटील, अमित पाटील, सौरभ नरके, गणेश पाटील, रोहन पाटील, आहिद खान, अमोल इंगवले, ओंकार बागडी, सुदर्शन चव्हाण, सौरभ बामणीकर, स्वराज चौगुले, सौरभ पाटील, सुयश साळोखे, करण शिंदे, विनायक माने, करण पाटील, नीलेश देवडकर. प्रशिक्षक : अभिजित वाणिरे, योगेश देशपांडे, सागर जाधव यांनी काम पहिले. स्पर्धेच्या बक्षीस वितरणप्रसंगी पन्हाळ्यातील आजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य मोहन वनशेट्टी, हॉकी प्रशिक्षक उदय पवार, विजय साळोखे, मोहन भांडवले आदी उपस्थित होते.

# ॲड. रविराज बिरजे यांना रौप्यपदक



रविराज बिरजे

वडणगे, ता. ३ : शिवाजी विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या एलएलबी- स्पेशल परीक्षेत भारती विद्यापीठाच्या न्यू लॉ कॉलेजच्या रविराज बिरजे यांनी कोल्हापूर, सांगली व सातारा या तीन जिल्ह्यांत तिसरा क्रमांक मिळवला. त्यांना रौप्यपदकाने गौरवण्यात आले. यशवंतराव चव्हाण विद्यापीठात त्यांनी इंग्रजी साहित्य पदवी परीक्षेत सुवर्णपदक मिळवले असून विविध संस्थांमध्ये त्यांनी चौदाहून अधिक वर्षे अध्यापनाचे काम केले आहे. सध्या ते वकिली करत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
-4 OCT 2019
तरुण भारत

# आंतरविभागीय कुस्तीत फ्री स्टाईलमध्ये विजयसिंह यादव कॉलेजला विजेतेपद

प्रतिनिधी
वाकरे

कुडीत्रे (ता. करवीर) येथील पै. युवराज पाटील कुस्ती संकुलात झालेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत कोल्हापूर, सांगली, सातारा आंतरविभागीय कुस्ती स्पर्धेत पुरुष फ्री स्टाईल कुस्तीमध्ये विजयसिंह यादव कॉलेज, वडगावने सर्वसाधारण विजेतेपद मिळवले तर उपविजेतेपद राधानगरी महाविद्यालय, राधानगरी आणि तृतीय क्रमांक सदाशिवराव मंडलिक कॉलेज, मुरगूडने मिळवला. या स्पर्धेचे संयोजन म. ह. शिंदे महाविद्यालय, तिसंगी (ता. गगनबावडा) या कॉलेजने केले आहे.

**पुरुष विभाग फ्री स्टाईल कुस्ती स्पर्धेचा गटावर निकाल पुढीलप्रमाणे**

**गट ५७ किलो-** ओंकार केरबा लाड- (राधानगरी महाविद्यालय, राधानगरी), संभाजी शिवाजी सावंत - बी. डी. सी. कॉलेज, पाटण, अभिषेक अरुण तडाखे - संपतराव माने कॉलेज, खानापूर **गट ६१ किलो-** सागर तालासो सुळ - एल. बी. एस. कॉलेज सातारा, ऋषिकेश गंगाराम घराळ - एस. बी. खाडे, कॉलेज, कोपार्डे, कुलदीप बापुसो पाटील - राधानगरी महाविद्यालय, राधानगरी, **गट ६५ किलो -** निलेश अब्बास हिरागुडे - सदाशिवराव मंडलिक कॉलेज, मुरगूड, प्रकाश शिवाजी पाटील - विठ्ठलराव पाटील कॉलेज कळे, विनायक बाबुराव वास्कर - सदाशिवराव मंडलिक कॉलेज मुरगूड, **गट ७० किलो -** प्रथमेश बाबासो गुरव - बी. ये. बी. एन. कॉलेज चिखली, आकाश प्रभाकर कापडे - सदाशिवराव मंडलिक कॉलेज मुरगूड, प्रतीक पंडित म्हेतर - राधानगरी महाविद्यालय राधानगरी, **गट ७४ किलो** - सुजित कृष्णात कानेरकर - यशवंतराव वारणा कॉलेज वारणानगर, महेश साहेबराव गवळी - बापूजी साळुंखे कॉलेज मिरज, बापूजी साळुंखे कॉलेज कराड. **गट ७९ किलो -** अनिकेत कृष्णत चव्हाण - एस. बी. एम. एम कॉलेज रहिमतपूर केशव अनिल गावडे - शंकरराव जगताप कॉलेज वाघोली भगतसिंग सूर्यकांत खोत - विठ्ठलराव पाटील कॉलेज कळे : **गट ८६ किलो -** अंकुश ईश्वरा माने - विजयसिंह यादव कॉलेज वडगांव, सागर सदाशिव तमखडे - नागनाथ आण्णा नायकवडी कॉलेज झरे, अमोल नवनाथ कोंडेकर - विठ्ठलराव पाटील कॉलेज कळे **गट ९२ किलो -** वैभव कृष्णात रायकर - विजयसिंह यादव कॉलेज वडगांव, ओंकार शंकर चौगले - राधानगरी महाविद्यालय राधानगरी, अजय शंकर शेंडगे - बाबा नाईक कॉलेज कोकरुड.

**शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतरविभागीय कुस्ती स्पर्धा**